| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | ०८ | ११ | २०१४ |
| | नोंदणी दिनांक | : | ०८ | ११ | २०१४ |
| | निकाल दिनांक | : | १४ | ०८ | २०२६ |
| | कालावधी | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | : | ११ | ०९ | ०६ |

**भाग – अ**

**नमुना क्र.३२**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(i) अन्वये)

**श्रीरामपुर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.१) यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी : जितेंद्र दु. जाधव)**

**नियमित फौजदारी खटला क्र.३४०/२०१४** **अपराध क्र.I ९४/२०१४**

संगणकीकृत नोंदणी क्र.एम.एच.ए.एच.०६–००१६२४–२०१४ **निशाणी – ६४.**

| | | | |
|---|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | : | | **महाराष्ट्र शासन** व्दारा,<br>शहर पोलिस स्टेशन,<br>ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर. |
| **विधिज्ञ** | | | ॲड. श्री. एस. आर. माढेकर. |
| **आरोपी** | : | | **१. दानीश जानमहंम्मद उर्फ जैनुद्दीन शेख,**<br>वय : ३५ वर्षे, धंदा : शेती,<br>रा. पापजलाल रोड, वॉर्ड क्र.२, श्रीरामपुर,<br>ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर.<br>**२. वसिम उस्मान सय्यद,**<br>वय : ३९ वर्षे, धंदा : ऑटो चालक,<br>रा. काझीबाबा रोड, सुभेदार वस्ती, वॉर्ड क्र.२,<br>श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर. |
| **विधिज्ञ** | : | | ॲड. आरिफ बी. शेख. |

## भाग – ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याचा दिनांक | : | १८/०३/२०१४ |
| २. | फिर्याद दाखल दिनांक | : | १८/०३/२०१४ |
| ३. | दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | : | ०८/११/२०१४ |
| ४. | दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | : | २३/०८/२०१६ |
| ५. | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | १०/०१/२०१९ |
| ६. | न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | : | १२/०८/२०२६ |
| ७. | न्यायनिर्णय दिनांक | : | १२/०८/२०२६ |
| ८. | न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | : | निरंक<br>आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्र. | आरोपींचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | दानीश जानमहंम्मद उर्फ जैनुद्दीन शेख, | १३/०९/२०१४ | २६/११/२०१४ | भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३९४, ३८४, ४२७, ५०४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सह कलम ३४. | | | |
| २. | वसिम उस्मान सय्यद | ३०/०३/२०१४ | १५/०४/२०१४ | भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३९४, ३८४, ४२७, ५०४ सह कलम ३४. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार

### अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार

| सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | मनोज प्रकाश चिंतामणी | फिर्यादी | ३३ |
| २. | युसुफ इमामभाई पठाण | साक्षीदार | ३५ |
| ३. | मुन्नाभाई इमामभाई पठाण उर्फ मुनीरखान इमामखान पठाण | साक्षीदार | ३८ |
| ४. | दिपक वसंत ताके | पंच | ३८ |
| ५. | रविंद्र साहेबराव चव्हाण | पंच | ४३ |
| ६. | अनिल रामचंद्र भिसे | तपासी अधिकारी | ५२ |
| ७. | डॉ. शरद माधवराव सातपुते | वैदयकीय अधिकारी | ६० |

**ब. आरोपीचे साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | -- | -- |

**क. न्यायालयाचे साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | -- | -- |

**अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालय यांचे कागदपत्रांचा तपशील**

**अ. अभियोग पक्ष**

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | निरंक | -- |

**ब. आरोपी**

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | निरंक | -- |

**क. न्यायालय**

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | निरंक | -- |

**मुद्देमालाचा तपशील**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | | -- |

## न्यायनिर्णय

(घोषित केल्याचा दिनांक : १४ ऑगस्ट, २०२६)

प्रस्तुत खटला आरोपींविरूध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम

३९४, ३८४, ४२७, ५०४ सहकलम ३४ प्रमाणे चालविण्यात आला.

## <u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे</u> :-

२) यातील फिर्यादी नामे मनोज प्रकाश चिंतामणी, यांनी दिनांक १८/०३/२०१४ रोजी असे बयान दिले की, त्याचे धान्य दुकान गोंधवणी रोडवर सिंधी मंदिरासमोर आहे. सदर धान्य दुकानावर फिर्यादी हा स्वतः बसतो. फिर्यादीच्या धान्य दुकानावर दुकानाचे मागे राहणारे आरोपी दानिश जैनद्दीन शेख, वसीम उस्मान शेख (सय्यद), ढम्या साळुंके (घिसाडी) व त्याचा एक मित्र असे नेहमी फिर्यादीच्या धान्य दुकानात येतात व पैसे न देता धान्य घेवून जातात. एक दोन वेळा फिर्यादीने आरोपी यांना धान्याचे पैसे मागितले परंतु त्यांनी पैसे दिले नाही. दिनांक १४/०३/२०१४ रोजी वरील सर्व आरोपी हे फिर्यादीच्या दुकानावर आले व त्यांनी फिर्यादीला २०,०००/- रुपये दे तसेच रिकाम्या ४० धान्याच्या गोण्या दे असे म्हटले. त्यावरुन फिर्यादीने वर नमुद आरोपींना पैसे व गोण्या देण्याचे नाकारले तेव्हा वर नमुद आरोपी यांनी फिर्यादीला बंदुक दाखवून मारुन टाकु अशी धमकी दिली होती.

३) दिनांक १८/०३/२०१४ रोजी सकाळी ११.१५ वाजताच्या सुमारास फिर्यादी व त्याचा लहान भाऊ प्रफुल असे दुकानात हजर होते. फिर्यादी हा त्याची मोटारसायकल क्रमांक एमएच-१७/एबी-५६६० याने एम.आय.डी.सी. मधे जाण्यासाठी निघाला असता त्याच्या दुकानाच्या शिवाजी रोड कडे जाणा-या १०० ते १५० फुट अंतरावर वेस्टर्न चौकात सागर रसवंती रोडवर वर नमुद तीन आरोपी हे एका लाल रंगांची विना नंबर प्लेट असलेली महिंद्राची मोपेड मोटारसायकलने समोरुन आले. वर नमुद आरोपी फिर्यादीला पाहून फिर्यादीचे नाव घेवून शिवीगाळ करु लागले व आरोपी दानीश हा मोठमोठयाने ओरडून अश्लील शिवीगाळ करु लागला. त्यावेळेस फिर्यादी त्यास शिवीगाळ का करतो असे म्हणाला असता आरोपी दानीश व त्याच्या

सोबतचे दोन इसम असे फिर्यादीला म्हणाले की, ''तेरे को ज्यादा हो गया क्या'' असे म्हणुन त्यांनी फिर्यादीला शिवीगाळ व मारहाण करण्यास सुरु केली. वसिम उस्मान शेख याने त्याच्या हातातील फायटरने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या दंडावर, छातीवर, पाठीवर मारण्यास सुरुवात केली. आरोपी दानिश याने त्याच्या पॅन्टच्या खिश्यातील काहीतरी ब्लेडकटर सारखे काढून फिर्यादीच्या छातीवर समोरुन वार केला. त्यावेळेस एक अनोळखी इसम याने फिर्यादीला लाकडी दांडक्याने मारले. वर नमुद तिनही इसम व एक अनोळखी इसम हे फिर्यादीच्या दुकानात गेले व दुकानातील धान्याचे पोते फेकफाक करुन दुकानातील गल्ल्यात असलेले रोख रुपये १९,५००/– त्यामधे रक्कम रुपये ५००/– व १००/– रुपये दराच्या नोटा असलेले बळजबरीने काढून घेवून गेले. सदर घटनेच्या वेळेस त्याठिकाणी असलेले सुरेश मुरलीधर वाघ, अर्जुन चव्हाण, सागर गाडगे यांनी सदरची घटना पाहिलेली आहे. आरोपी दानिश याने फिर्यादीच्या छातीवर वार केल्यामुळे फिर्यादीचा शर्ट फाटून छातीस उजव्या बाजुस मार लागून दुखापत झाल्याने फिर्यादीने आरोपींविरुद्ध पोलिस स्टेशन येथे रिपोर्ट दिला. अशा रिपोर्टवरुन शहर पोलिस स्टेशन, श्रीरामपुर येथे गुन्हा नोंद करण्यात आला.

४) सदर रिपोर्टवरुन पोलिसांनी गु.र.नं.I–९४/२०१४ नोंदविला. सदर गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस उपनिरीक्षक ए. आर. भिसे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा केला, जप्ती पत्रकानुसार गुन्हयातील मुद्देमाल एक लोखंडी फायटर, एक काळया रंगांची मुठ असलेली चावी, एक लाकडी दांडका असा मुद्देमाल जप्त केला. सदर आरोपी यांच्याविरुध्द सबळ पुरावा उपलब्ध असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध दोषारोपपत्र तयार करुन विदयमान न्यायालयात दाखल केले.

५) निशाणी क्र.२७ वर आरोपी क्र.१ व २ विरूध्द भारतीय दंड संहिता,

१८६० चे कलम ३९४, ३८४, ४२७, ५०४ सहकलम ३४ अन्वये दोषारोप ठेवला. तो आरोपींना त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला, आरोपींनी सदर दोषारोप मान्य नसल्याचे सांगुन खटला चालविण्याचे निवेदन केले.

६) सदर प्रकरणात अभियोग पक्षाने फिर्यादी व इतर साक्षीदार यांची साक्ष नोंदवून घेतली. अभियोग पक्षाने सदर प्रकरणात पुरावा बंद करण्याकरिता तोंडी विनंती केली. त्यामुळे निशाणी क्र.१ खाली आदेश पारित करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपी क्र.१ व २ विरुध्द आलेल्या पुराव्याच्या आधारे आरोपी क्र.१ व २ यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये जबाब निशाणी क्रमांक ६२ व ६३ वर नोंदविण्यात आले.

७) **प्रस्तुत खटल्याचे न्यायनिर्णयासाठी उपस्थित मुद्यांवरील माझे निष्कर्ष खालील कारणमिमांसेच्या आधारे** :-

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षातर्फे हे सिद्ध केले काय की, दि.१८/०३/२०१४ रोजी ११.१५ वाजताचे सुमारास वॉर्ड क्र. ०७, संगमनेर रोड, श्रीरामपुर मोटर्सचे कार्यालय, श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जिल्हा अहमदनगर, येथे आरोपींनी संगनमताने बळजबरीने चोरी करण्याच्या उद्देशाने फिर्यादी मनोज प्रकाश चिंतामणी याच्या संमतीशिवाय त्याच्या ताब्यातून रक्कम रुपये १९,५००/- हिसकावून त्यास दुखापत पोहचविली. त्याव्दारे त्यांनी भा.दं.सं. **कलम ३९४ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला? | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| २) | अभियोग पक्षातर्फे हे सिद्ध केले काय की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी येथे आरोपींनी संगनमताने फिर्यादीला गंभीर दुखापत पोहचविण्याचा धाक दाखवून त्यास त्याच्या ताब्यातील मालमत्ता किंवा मौल्यवान वस्तु सुपुर्त करण्यास अप्रामाणिकपणे प्रवृत्त केले. त्याव्दारे त्यांनी भा.दं.सं. **कलम ३८४ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला? | **नकारार्थी.** |
| ३) | अभियोग पक्षातर्फे हे सिद्ध केले काय की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी येथे आरोपींनी संगनमताने फिर्यादीच्या मालकीच्या दुकानातील धान्याचे पोते व धान्य फेकून फिर्यादीचे आर्थिक नुकसान केले. त्याव्दारे त्यांनी भा.दं.सं. **कलम ४२७ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला? | **नकारार्थी.** |
| ४) | अभियोग पक्षातर्फे हे सिद्ध केले काय की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी येथे आरोपींनी संगनमताने फिर्यादीस शिवीगाळ करुन त्याचा अपमान केला व त्यामुळे सार्वजनिक शांतता भंग केली. त्याव्दारे त्यांनी भा.दं.सं. **कलम ५०४ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला? | **नकारार्थी.** |
| ५) | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**-: कारणमिमांसा :-**

८) आरोपींविरुध्दचे आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने फिर्यादी साक्षीदार क्र.१ मनोज प्रकाश चिंतामणी, यांची साक्ष निशाणी क्र.३३ वर, साक्षीदार क्र.२ युसुफ इमामभाई पठाण, यांची साक्ष निशाणी क्र.३५ वर, साक्षीदार क्र.३ मुन्नाभाई

इमामभाई पठाण उर्फ मुनीरखान इमामखान पठाण, यांची साक्ष निशाणी क्र.३८ वर, पंच साक्षीदार क्र.४ दिपक वसंत ताके, यांची साक्ष निशाणी क्र.३८ वर, पंच साक्षीदार क्र.५ रविंद्र साहेबराव चव्हाण, यांची साक्ष निशाणी क्र.४३ वर, तपासी अधिकारी साक्षीदार क्र.६ अनिल रामचंद्र भिसे, यांची साक्ष निशाणी क्र.५२ व वैदयकीय अधिकारी साक्षीदार क्र.७ डॉ. शरद माधवराव सातपुते, यांची साक्ष निशाणी क्र.६० वर नोंदविली. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. आर. माढेकर तसेच आरोपीतर्फे वकील श्री. आरिफ बी. शेख यांचा युक्तिवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करीता</u> :-**

९) मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी संल्लग्न असल्याने त्यांची पुनरावृत्ती होवु नये म्हणुन एकत्रित चर्चेत घेतले आहेत.

१०) अभियोग पक्षाने सदर प्रकरणात फिर्यादी साक्षीदार क्र.१ मनोज प्रकाश चिंतामणी, यांची साक्ष नोंदवुन घेतली. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीत असे सांगितले आहे की, ते आरोपींना ओळखतात. गोंधवणी रोड येथे त्यांचे दुकान असून त्याच्यासमोर आरोपींचा बसण्याचा अड्डा आहे. घटना दिनांक १८/०३/२०१४ रोजी सकाळी ११.१५ वाजताच्या सुमारास सागर रसवंती समोर घडली. त्यावेळेस ते मोटारसायकल क्रमांक एमएच-१७/५६६० ने त्याच्या दुकानाकडून एम.आय.डी.सी.कडे जात असतांना सागर रसवंतीसमोर आल्यानंतर आरोपी क्र.१ ते ३ यांनी त्याची गाडी अडविली. आरोपी क्र.१ ते ३ त्याला म्हणाले की, तु तुझ्या दुकानातील धान्य आम्हाला उधार देत नाही, तु जास्त माजला आहे, आम्हाला उलटून बोलतोस असे म्हणुन शिवीगाळ केली. त्यावेळेस त्याने शिवीगाळ करु नका असे सांगितले असता त्यांनी त्यास मारहाण करण्यास सुरुवात केली. आरोपी दानिशच्या हातात ब्लेडकटर होते, वसिंम सय्यद याच्या हातात लोख ंडी काळया रंगाचा फायटर होता, ढम्या

घिसाडीच्या हातामधे लाकडी काठी होती. दानिशने त्याच्या हातातील ब्लेडकटरने त्याच्या छातीला डाव्या बाजुला मारले. वसिमने त्याच्या हातातील फायटरने पोटावर मारले, ढम्या घिसाडी याने त्याच्या हातातील काठीने पाठीवर मारले. मारहाणीमुळे तो खाली पडला, अंगावर रक्ताची धार सुरु झाली, तेथे गर्दी जमा झाल्यावर आरोपी पळून गेले. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीत पुढे असे कथन केले की, ते त्याच्या गाडीवर घरी आहे, शर्ट फाटलेले होते, शर्टावर रक्ताचे डाग होते. त्यानंतर ते पोलिस स्टेशन येथे गेले. पोलिसांनी त्यास हॉस्पीटलमधे जावून उपचार घेण्यास सांगितले. त्यानंतर ते साखर कामगार हॉस्पीटलमधे गेले व उपचार घेतला. ते दवाखान्यात असतांना सर्व आरोपी त्याच्या दुकानात गेले व दुकानातील काटा व माल तोडफोड केली. दुकानाच्या गल्ल्यात १९,०००/- ते २०,०००/- रुपयांची रक्कम होती. सदर रक्कम ते घेवून गेले. पोलिस दवाखान्यात आले. तेथे त्याने घटनेबाबत बयान रिपोर्ट नि.क्र.३४ दिला.

११) अभियोग पक्षाने सदर प्रकरणात साक्षीदार क्र.२ युसुफ इमामभाई पठाण, यांची साक्ष नोंदवुन घेतली. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीत असे सांगितले आहे की, ते आरोपींना ओळखतात. ते फिर्यादीला ओळखतात. घटना दिनांक १८/०३/२०१४ रोजी सकाळी ११.०० ते ११.३० वाजताच्या दरम्यान त्यांच्या हॉटेलच्या समोर, मौलाना आझाद चौक, श्रीरामपुर येथे घडली होती. घटनेच्या वेळेस दोन मोटरसायकलचा आपसात अपघात झाला होता. त्यानंतर दोन्ही वाहन चालकांना उपचाराकरिता दवाखान्यात नेले होते. याशिवाय त्यांना घटनेबाबत काहीही माहिती नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला पुष्टी न दिल्याने अभियोग पक्षाला सदर साक्षीदाराच्या उलटतपासाची परवानगी दिली परंतु त्याच्या उलटतपासात आरोपींविरुध्द पुरावा येईल असे काहीही प्रस्थापित झाले नाही.

१२) अभियोग पक्षाने सदर प्रकरणात साक्षीदार क्र.३ मुन्नाभाई इमामभाई पठाण

उर्फ मुनीरखान इमामखान पठाण, यांची साक्ष नोंदवुन घेतली. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीत असे सांगितले आहे की, ते आरोपींना ओळखतात. ते फिर्यादीला ओळखतात. घटना दिनांक १८/०३/२०१४ रोजी सकाळी ११.०० ते ११.३० वाजताच्या दरम्यान त्यांच्या हॉटेलच्या समोर, मौलाना आझाद चौक, श्रीरामपुर येथे घडली होती. घटनेच्या वेळेस दोन मोटरसायकलचा आपसात अपघात झाला होता. त्यानंतर दोन्ही वाहन चालकांना त्याने व त्याच्या भावाने उपचाराकरिता दवाखान्यात रिक्षाने पाठविले होते. याशिवाय त्यास घटनेबाबत काहीही माहिती नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला पुष्टी न दिल्याने अभियोग पक्षाला सदर साक्षीदाराच्या उलटतपासाची परवानगी दिली परंतु त्याच्या उलटतपासात आरोपींविरुध्द पुरावा येईल असे काहीही प्रस्थापित झाले नाही.

१३) अभियोग पक्षाने सदर प्रकरणात पंच साक्षीदार क्र.४ दिपक वसंत ताके, यांची साक्ष नोंदवुन घेतली. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीत असे सांगितले आहे की, दिनांक १६/०९/२०१४ रोजी पोलिसांनी त्यास कोठेही बोलाविले नाही. पोलिसांनी त्याच्यासमक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. त्याच्यासमक्ष पोलिसांना कोणीही कशाचेही निवेदन दिले नाही. सदर साक्षीदारास त्याच्या साक्षीदरम्यान निवेदन पंचनामा दाखविण्यात आला. सदर साक्षीदाराने निवेदन पंचनामावर त्याची सही नसल्याचे सांगितले. तसेच त्यातील मजकुर सुध्दा त्यास माहिती नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला पुष्टी न दिल्याने अभियोग पक्षाला सदर साक्षीदाराच्या उलटतपासाची परवानगी दिली परंतु त्याच्या उलटतपासात आरोपींविरुध्द पुरावा येईल असे काहीही प्रस्थापित झाले नाही.

१४) अभियोग पक्षाने सदर प्रकरणात पंच साक्षीदार क्र.५ रविंद्र साहेबराव चव्हाण, यांची साक्ष नोंदवुन घेतली. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीत असे सांगितले

आहे की, दिनांक ०२/०४/२०१४ रोजी पोलिसांनी त्यास कोठेही बोलाविले नाही. पोलिसांनी त्याच्यासमक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. त्याच्यासमक्ष पोलिसांना कोणीही कशाचेही निवेदन दिले नाही. सदर साक्षीदारास त्याच्या साक्षीदरम्यान निवेदन पंचनामा दाखविण्यात आला. सदर साक्षीदाराने निवेदन पंचनामावर त्याची सही नसल्याचे सांगितले. तसेच त्यातील मजकुर सुध्दा त्यास माहिती नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला पुष्टी न दिल्याने अभियोग पक्षाला सदर साक्षीदाराच्या उलटतपासाची परवानगी दिली परंतु त्याच्या उलटतपासात आरोपींविरुध्द पुरावा येईल असे काहीही प्रस्थापित झाले नाही.

**१५)** अभियोग पक्षाने सदर प्रकरणात तपासी अधिकारी साक्षीदार क्र.६ अनिल रामचंद्र भिसे, यांची साक्ष नोंदवुन घेतली. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीत असे सांगितले आहे की, ते दिनांक १८/०३/२०१४ रोजी शहर पोलिस स्टेशन, श्रीरामपुर येथे कार्यरत होते. सदर दिवशी गु.र.क्र.९४/२०१४ भारतीय दंड संहिताचे कलम ३८४, ३९४, ५०४, ३४ अन्वये गुन्हा नोंद करुन वरिष्ठांनी सदर गुन्हयाचा तपास तोंडी आदेशानुसार त्यांच्याकडे दिला. सदर गुन्हयाच्या तपासात त्यांनी घटनास्थळी जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. सदर गुन्हयातील आरोपी यांना अटक करण्यात आली. आरोपी क्र.२ वसिम याने गुन्हयाच्या तपासात अटकेत असतांना गुन्हयाची कबुली दिली. त्यावरुन त्याचा निवेदन कबुली पंचनामा तयार करण्यात आला. त्यानंतर शासकीय वाहनाने ते, पंच असे आरोपीच्या सांगण्यानुसार आरोपीच्या राहते घरी गेले. त्याठिकाणी आरोपीने त्याच्या राहत्या घरातून फाईटर काढून दिले. सदर फाईटर जप्ती पत्रकानुसार आरोपी वसिम याच्या ताब्यातून जप्त केले व त्यासंबंधी त्यांनी निवेदन जप्ती पंचनामा नि.क्र.५४ तयार केला. पोलिस स्टेशन येथे येवून गुन्हयातील जप्त मुद्देमाल पोलिस स्टेशन मुद्देमालगृहात जमा करुन त्यासंबंधी मुद्देमालपावती प्राप्त करुन दोषारोपपत्रामधे सामील केली. आरोपी क्र.१ नामे दानिश

शेख यास गुन्हयात अटक केली असता त्याने सदर गुन्हयाच्या तपासात अटकेत असतांना गुन्हयाची कबुली दिली. त्यावरुन त्याचा निवेदन कबुली पंचनामा तयार करण्यात आला.त्यानंतर शासकीय वाहनाने ते, पंच असे आरोपीच्या सांगण्यानुसार आरोपीच्या राहते घरी कारेगांव येथे असलेल्या शेडमधे गेले. त्याठिकाणी आरोपीने त्याच्या शेडमधून काळया रंगांची मुठ असलेली तीन इंच लांबीची चावी व एक काठी काढून दिले. सदर मुद्देमाल जप्ती पत्रकानुसार आरोपी दानिश याच्या ताब्यातून जप्त करुन त्यासंबंधी निवेदन जप्ती पंचनामा नि.क्र.५७ तयार केला. पोलिस स्टेशन येथे येवून गुन्हयातील जप्त मुद्देमाल पोलिस स्टेशन मुद्देमालगृहात जमा करुन त्यासंबंधी मुद्देमालपावती प्राप्त करुन दोषारोपपत्रामधे सामील केली. त्यांनी सदर गुन्हयाच्या तपासात साक्षीदारांचे बयान त्यांच्या सांगण्यानुसार नोंदवून घेतले. सदर गुन्हयात साखर कामगार हॉस्पीटल, श्रीरामपुर येथे पत्र देवून जखमीला असलेल्या जखमेबाबत वैदयकीय प्रमाणपत्र प्राप्त करुन ते दोषारोपपत्रामधे दाखल केले. सदर गुन्हयाच्या तपासात आरोपींविरुद्ध सबळ पुरावा उपलब्ध असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध दोषारोपपत्र तयार करुन विदयमान न्यायालयात दाखल केले.

**१६)** अभियोग पक्षाने सदर प्रकरणात वैदयकीय अधिकारी साक्षीदार क्र.७ डॉ. शरद माधवराव सातपुते, यांची साक्ष नोंदवुन घेतली. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीत असे सांगितले आहे की, ते साखर कामगार हॉस्पीटल येथे सन १९८८ पासुन वैदयकीय अधिकारी म्हणुन कार्यरत आहेत. दिनांक १८/०३/२०१४ रोजी रुग्ण नामे मनोज प्रकाश चिंतामणी हा उपचाराकरिता दवाखान्यात भरती झाला. सदर रुग्णास तपासणी करुन त्यासंबंधी वैदयकीय प्रमाणपत्र नि.क्र.६१ देण्यात आले. सदर साक्षीदार यांनी त्यांच्या साक्षीत पुढे असे कथन केले की, नि.क्र.६१ मधील दुखापत क्र.१ ही ब्लेडकटर सारख्या धारदार शस्त्राने होवु शकते तसेच त्यामधे नमुद इतर दुखापत ही काठी आणि हाथाबुक्क्याने तसेच जाड आणि बोधड अशा शस्त्राने होवु शकते.

१७) अभियोग पक्षाने दाखल केलेल्या पुराव्याचे व कागदपत्रांचे अवलोकन केले. सदर प्रकरणात आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिताचे कलम ३९४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले. सदर बाब सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षास असे सिध्द करावे लागेल की, यातील आरोपी यांनी जबरी चोरी करतांना किंवा करण्याचा प्रयत्न करत असतांना इच्छापुर्वक दुखापत पोहचविली. त्याअनुषंगाने सदर प्रकरणातील अभियोगपक्षाचे सर्वात महत्वाचे साक्षीदार म्हणजे फिर्यादी साक्षीदार क्र.१ हे आहेत. भारतीय दंड संहिताचे कलम ३९४ नुसार दोष सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षास केवळ फिर्यादीस दुखापत झाली असल्याचे सिध्द करणे पुरेसे नाही. अभियोगपक्षास ही बाब सिध्द करावी लागेल की, जबरी चोरी करण्याच्या वेळेस किंवा तसा प्रयत्न आरोपी हे स्वेच्छेने करीत असतांना सदर दुखापत ही स्वेच्छेने केली असल्याचे देखील सिध्द करणे आवश्यक आहे. फिर्यादी याच्या साक्षीचे अवलोकन केले असता फिर्यादी याने त्याच्या साक्षीमधे स्पष्टपणे असे नमुद केले आहे की, घटनेच्या वेळेस दिनांक १८/०३/२०१४ रोजी आरोपी क्र.१ ते ३ यांनी फिर्यादीला सागर रसवंती समोर गाडी अडविले आणि त्यावेळेस आरोपी यांनी त्यास म्हटले की, तु तुझ्या दुकानातील धान्य आम्हाला उधार देत नाही, तु जास्त माजला आहे, आम्हाला उलटून बोलतोस असे म्हणुन शिवीगाळ केली.

१८) फिर्यादी याने त्याच्या साक्षीमधे असे कोठेही नमुद केले नाही की, यातील आरोपी यांनी त्यास त्याच्या ताब्यातील रक्कम जबरीने चोरी करण्याच्या प्रयत्नात फिर्यादीला दुखापत पोहचविली. फिर्यादीने त्याच्या साक्षीमधे नमुद केल्यानुसार फिर्यादी व आरोपी यांच्यातील घटना ही केवळ दुकानातील धान्य उधार देत नाही या कारणावरुन झाल्याचे दिसून येते. त्यामुळे भारतीय दंड संहिताचे कलम ३९४ अन्वये यांच्याविरुद्ध अभिलेखावर कोणतीही बाब दिसून येत नाही. सदर प्रकरणात अभियोगपक्षाने इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांची साक्ष नोंदवून घेतली असता साक्षीदार

क्र.२ व ३ यांनी त्यांच्या साक्षीमधे स्पष्टपणे असे कथन केले आहे की, त्यांच्यासमक्ष कोणतीही घटना घडलेली नाही. सदर दोन्ही साक्षीदार यांनी त्यांच्या साक्षीमधे असे कथन केले आहे की, घटनेच्या वेळेस दोन मोटारसायकलचा आपसात अपघात झाला होता आणि त्यानंतर दोन्ही वाहनचालकांना उपचाराकरिता दवाखान्यात नेले होते. सदर महत्वाच्या दोन्ही साक्षीदार यांनी त्यांच्या साक्षीमधे स्पष्टपणे असे सांगितले की, त्यांच्यासमक्ष गुन्हयातील दोन्ही आरोपी यांनी फिर्यादीला फायटर व ब्लेडकटरने मारुन गंभीर दुखापत केली नाही व त्याच्या खिशातील रक्कम रुपये १९,५००/– जबरदस्तीने हिसकावून घेतले नाही.

१९) सदर प्रकरणात आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिताचे कलम ३८४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले. त्याअनुषंगाने अभियोगपक्षास ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे की, यातील आरोपी यांनी फिर्यादीला दुखापत पोहचविण्याची भिती घालवून त्याद्वारे कोणतीही मालमत्ता किंवा कोणतीही रोख रक्कम आरोपी यांना सुपुर्त करण्याकरिता प्रवृत्त केले. सदर प्रकरणात अभियोगपक्षाचे महत्वाचे साक्षीदार म्हणजे फिर्यादी यांनी त्यांच्या साक्षीमधे असे सांगितले की, घटनेच्या वेळेस यातील आरोपींनी धान्य उधार देत नाही या कारणावरुन त्यास मारहाण केली. परंतु सदर फिर्यादी याने त्याच्या साक्षीमधे असे कोठेही कथन केले नाही की, यातील आरोपी यांनी फिर्यादीला दुखापत पोहचविण्याची भिती घालवून त्याच्या ताब्यातील रोख रक्कम ही आरोपी यांना देण्यास प्रवृत्त केले. फिर्यादी याच्या साक्षीचे अवलोकन केले असता यातील आरोपी व त्यांच्यामधे झालेल्या वादानंतर फिर्यादी हा उपचाराकरिता दवाखान्यात गेला असता त्यानंतर यातील आरोपी हे फिर्यादीच्या दुकानात गेले व तेथील दुकानाच्या गल्ल्यातून रक्कम रुपये १९,०००/– ते २०,०००/– घेवून गेले. सदर फिर्यादीच्या साक्षीवरुन यातील फिर्यादी हा जर उपचाराकरिता दवाखान्यात भरती आहे तर अशापरिस्थितीत फिर्यादी यास त्याच्या दुकानातील रक्कम आरोपी यांनी काढून नेली किंवा त्याच्या

दुकानातील सामानाची आरोपींनी तोडफोड केली त्यास कसे आणि कोणाकडून माहिती झाले याबाबत कोणतीही साखळी जुळतांना दिसून येत नाही. फिर्यादी याच्या साक्षीनुसार फिर्यादी हा उपचाराकरिता दवाखान्यात भरती असतांना त्याच्या दुकानातील रक्कम आरोपींनी काढून नेली असे फिर्यादीने कथन केले त्यामुळे यातील आरोपी यांनी फिर्यादी यास दुखापत पोहचविण्याची भिती दाखविली आणि त्यानंतर फिर्यादीने त्याच्या ताब्यातील रक्कम ही आरोपींना सुपुर्त केली असा कोणताही पुरावा अभिलेखावर अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे फिर्यादीच्या साक्षीचे अवलोकन केले असता यातील आरोपी यांनी नेमकी कोणती भिती निर्माण केली, त्या भितीचे स्वरुप काय आणि त्या भितीमुळे फिर्यादीने कथित रक्कम ही आरोपी यांना दिली याबाबत अभियोगपक्षातर्फे कोणताही स्वतंत्र व विश्वासार्ह पुरावा अभिलेखावर सादर करण्यात आलेला नाही.

२०) सदर प्रकरणात आरोपी यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिताचे कलम ४२७ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले. सदर बाब सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षास ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे की, यातील आरोपींनी फिर्यादी याच्या मालमत्तेस इच्छापुर्वक हाणी, नुकससान पोहचवून त्यामधे फिर्यादीचे आर्थिक नुकसान केले. सदर प्रकरणात अभियोगपक्षाचे महत्वाचे साक्षीदार फिर्यादी हे असून फिर्यादी यांनी त्यांच्या साक्षीमधे असे कथन केले की, यातील आरोपी यांनी फिर्यादीच्या दुकानामधे जावून फिर्यादीच्या दुकानातील वजनकाटा व इतर साहित्य तोडफोड करुन त्यामधे फिर्यादीचे आर्थिक नुकसान केले. फिर्यादी याच्या साक्षीनुसार आरोपी यांनी ज्यावेळेस फिर्यादीच्या दुकानातील मालमत्तेस नुकसान पोहचविले त्यावेळेस फिर्यादी हा उपचाराकरिता दवाखान्यात भरती होता. त्यावरुन फिर्यादी हा सदर घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. त्यानंतर असा प्रश्न निर्माण होतो की, यातील फिर्यादी यास त्याच्या दुकानातील मालमत्तेचे नुकसान हे आरोपी यांनी केले याबाबत त्यास कशाच्या आधारे माहिती

झाली. त्याबाबत फिर्यादी याने काहीही कथन केलेले नाही. तसेच सदर प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी सुध्दा त्यांच्या अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. सदर प्रकरणातील घटनास्थळ पंचनामावरील पंच साक्षीदार यांनी सुध्दा त्यांच्या साक्षीमधे स्पष्टपणे असे सांगितले की, पोलिसांनी त्यांच्यासमक्ष कोणताही पंचनामा तयार केला नाही. एकंदरीतच, यातील फिर्यादी याच्या दुकानाचे नुकसान आरोपी यांनी केले याबाबत कोणताही सबळ पुरावा अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेला नाही.

२१) सदर प्रकरणात आरोपी यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिताचे कलम ५०४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले. त्याअनुषंगाने अभियोगपक्षास ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे की, यातील आरोपी यांनी फिर्यादी यास सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ केली त्यामुळे त्याचा अपमान झाला व सार्वजनिक शांतता भंग केली. सदर प्रकरणात त्याअनुषंगाने अभियोगपक्षास गुन्हयाचे घटनास्थळ सिध्द करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणात बचावपक्षाच्या वकीलांनी घटनास्थळ पंचनामा मान्य केला त्यामुळे गुन्हयाचे घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाण असल्याचे सिध्द होते. त्यामुळे अभियोगपक्षास ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे की, यातील आरोपींनी फिर्यादी यास शिवीगाळ केली. फिर्यादी याच्या साक्षीचे अवलोकन केले असता फिर्यादी याने असे कथन केले की, यातील आरोपी यांनी त्यास शिवीगाळ केली. परंतु फिर्यादी याने त्याच्या साक्षीमधे त्यास आरोपी यांनी नेमकी काय शिवी दिली याबाबत काहीही कथन केलेले नाही. तसेच कोणत्या आरोपीने नेमकी काय शिवी दिली याबाबत सुध्दा कोणताही स्पष्ट पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सदर प्रकरणात फिर्यादी व्यतिरिक्त इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केलेले नाही. अभियोगपक्षाच्या कथनानुसार जर घटना ही सार्वजनिक ठिकाणी घडली असून अशापरिस्थितीत कोणत्याही स्वतंत्र साक्षीदार यांनी अभियोगपक्षास सहाय्य केले नाही त्यामुळे सदर घटनेबाबत शंका निर्माण होते. त्यामुळे अभियोगपक्ष आरोपीविरुद्ध ही बाब सिध्द करु शकले नाही की, यातील

आरोपी यांनी फिर्यादी यास सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ केली त्यामुळे त्याचा अपमान झाला व सार्वजनिक शांतता भंग झाली. फिर्यादी याने दाखल केलेली फिर्याद अभियोग पक्षाने शंकेपलीकडे जावुन सिद्ध केलेली नाही. आरोपी यांनी फिर्यादीला बळजबरीने चोरी करण्याच्या उद्देशाने फिर्यादी मनोज प्रकाश चिंतामणी याच्या संमतीशिवाय त्याच्या ताब्यातून रक्कम रुपये १९,५००/- हिसकावून त्यास दुखापत पोहचविली, फिर्यादीला धाक दाखवून त्यास त्याच्या ताब्यातील मालमत्ता किंवा मौल्यवान वस्तु सुपुर्त करण्यास अप्रामाणिकपणे प्रवृत्त केले तसेच फिर्यादीच्या मालकीच्या दुकानातील धान्याचे पोते व धान्य फेकून फिर्यादीचे आर्थिक नुकसान केले व फिर्यादीस शिवीगाळ करुन त्याचा अपमान केला व त्यामुळे सार्वजनिक शांतता भंग केली हे निःसंशयपणे पुराव्या अभावी अभियोग पक्ष सिद्ध करण्यास अपयशी ठरला आहे. म्हणुन मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.५ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>मुद्दा क्र.५ करिता</u> :-**

२२) अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता, अभियोग पक्षाने आरोपी क्र.१ व २ विरुध्दचे आरोप संशयापलीकडे सिध्द करणे गरजेचे होते. परंतु, अभियोग पक्ष आरोपी क्र.१ व २ विरुध्दचे आरोप संशंयापलीकडे सिध्द करु शकला नाही, त्यामुळे आरोपी क्र.१ व २ हे वरील आरोपांतुन निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.५ चे निष्कर्षाकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) **आरोपी क्र.१ दानीश जानमहंम्मद उर्फ जैनुद्दीन शेख व आरोपी क्र.२ वसिम उस्मान सय्यद,** यांना भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३९४, ३८४, ४२७, ५०४ सह कलम ३४ च्या आरोपांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता,

१९७३ चे कलम २४८(१) [भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१)] अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपी क्र. १ व २ यांनी दिलेला वैयक्तिक जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३) आरोपी क्र.१ व २ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ [भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१] च्या पुर्ततेकामी रक्कम रू.१५,०००/– चा प्रत्येकी वैयक्तिक जात मुचलका व जामीन कदबा सादर करावे.

४) गुन्हयांतील जप्त मुद्देमाल एक फायटर, एक काळया रंगाची मुठ असलेली चावी, एक लाकडी दांडके हे मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर कायदेशीररित्या नष्ट करण्यात यावे.

*(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)*

JITENDRA DUDHRAM JADHAO

Digitally signed by JITENDRA DUDHRAM JADHAO
Date: 2026.08.14 17:33:03 +0530

ठिकाण : श्रीरामपुर.
दिनांक : १४/०८/२०२६.

**(जितेंद्र दु. जाधव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, श्रीरामपुर.

**–: <u>प्र मा ण प त्र</u> :–**

प्रमाणित करण्यात येते की, या पी. डी. एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | श्रीमती ए. ए. दहिफळे,<br>(लघुलेखक श्रेणी–३). |
| न्यायालयाचे नांव | : | श्री. जितेंद्र दु. जाधव,<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.१, श्रीरामपुर. जि. अहमदनगर. |
| न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक | : | १४/०८/२०२६. |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | : | १४/०८/२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड दिनांक | : | १४/०८/२०२६. |